PUBLICATION – PUNYANAGARI
DATE – NOVEMBER 24, 2015
PAGE NO. – 11

# पुणे कनेक्ट २८ नोव्हेंबरला

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे कनेक्ट हा स्टार्टअपना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा, देशभरात महत्त्वाचा ठरलेला, एसईएपीचा गाजलेला उपक्रम येत्या २८ नोव्हेंबरला हॉटेल वेस्टीन येथे आयोजित करण्यात आला आहे. डिजिटल जगात अभिनव कल्पना (इनोव्हेशन इन द डिजिटल वर्ल्ड), ही संकल्पना आहे.

डिजिटल जगामध्ये क्रांती घडवून आणणाऱ्या स्टार्टअपना प्रोत्साहन आणि पाठींबा देणे, तसेच पुण्याला तंत्रज्ञानावर आधारीत नावीन्यपूर्ण उद्योगांचे जागतिक दर्जाचे केंद्र बनविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी नॅसकॉम-पुणे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, आयएसीसीआय आणि हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन आदी संस्था सहभागीदार आहेत. यावेळी एसईएपीचे अध्यक्ष एस. रामप्रसाद, सिस्कोचे अभियांत्रिकी आणि भारत विभागाचे अध्यक्ष अमित फडणीस यांचे बीजभाषण होईल. यामध्ये केपीआयटी टेक्नॉलॉजीजच्या प्रॉडक्टचे अनुप साबळे, ध्रुवचे अभियांत्रिकी विभागाचे उपाध्यक्ष अभय घैसास, ॲप्लाइड मायक्रो सर्किट्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप धारणे आदी सहभागी होणार आहेत.